# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**
**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता.जि.ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५१००१**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट क्रमांक ३२७-२२** **दिनांक ०६/११/२०२२**

## रेंटल कार बुकींग नावाने फसवणूक करण्यात आलेली ०१,४९,६४६/- रुपये रक्कम परत मिळविण्यास सायबर गुन्हे शाखेस यश.

मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रातील तुळींज पोलीस ठाणेचे हद्दीतील इसम नामे श्री. मन्सूर यांनी ऑनलाईन रेंटल कार बुकींग करण्याकरीता चौकशी करीत असताना त्यांना महादेव ट्रॅव्हल नावची वेबसाईट उघडली असता त्यामध्ये तक्रारदार यांनी मोबाईल नंबर, ईमेल आयडी इत्यादी माहिती भरली. काही वेळाने त्यांना फोन येवून सिक्युरीटी डिपॉझिट करण्याकरीता पुन्हा बँकेची माहिती भरण्यास सांगून त्यांनी कोणताही ओटीपी न येता अर्जदार यांच्या बँक खात्यामधून ०१,७३,९१२/- रुपयाची कपात झाल्याबाबत तक्रारी अर्ज सायबर गुन्हे कक्ष येथे चौकशीकामी प्राप्त झाला होता.

तक्रारदार यांचे बँक खात्यामधील झाले व्यवहाराची माहिती घेवुन सदर माहितीचे अवलोकन केले असता त्यांची रक्कम **Cred** हया पेमेंट गेटवेकडे वळते झाल्याचे निदर्शनास आले त्यामुळे संबधित कंपनीसोबत पत्रव्यवहार व पाठपुरावा करुन त्यामधील ०१,४९,६४६/- रुपयाची रक्कम तक्रारदार यांचे मुळ खात्यावर परत मिळविण्यात आलेले असुन उर्वरीत रक्केमबाबत चौकशी सुरु आहे.

**घ्यावयाची काळजी :-**

- **Online Booking** करताना संकेतस्थळाची पडताळणी करावी.
- खात्री झाल्याशिवाय कोणताही आर्थिक व्यवहार करू नये.
- मोबाईलचा ताबा घेईल असे **Screen Application (Anydesk,Team viewer)** डाऊनलोड करू नये.
- आपल्या बँकेची गोपनीय माहिती कोणाकडेही उघड करु नये.
- आपला ओटीपी किंवा इतर कोणताही पिन क्रमांक देवू नये.

**तरी सायबर गुन्हे कक्ष, मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातर्फे नागरिकांना अशा प्रकारे होणा-या फसवणूकीबाबत सतर्क राहणेबाबत जाहिर आवाहन करण्यात येत आहे. तसेच अशा प्रकारे कोणत्याही इसमाची फसवणूक झाल्यास तात्काळ नजीकच्या पोलीस ठाणेस, सायबर गुन्हे कक्षास संपर्क साधावा. तसेच www.cybercrime.gov.in अथवा 1930 या हेल्पलाईनवर संपर्क साधून तक्रार द्यावी.**

सदरची कामगिरी श्री. विजयकांत सागर, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे), यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री.सुजितकुमार गुंजकर, पो.उप.निरी. प्रसाद शेनोळकर, म.पो.हवा. माधूरी धिंडे, पो.अं प्रविण आव्हाड, म.सु.ब. आकाश बोरसे यांनी पार पाडली आहे.